# ग्रामीण दारिद्रय, रोजगार व आर्थिक विकास

**प्रा. गिराम मनोज बाबुराव**
सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग,
एच. पी. टी. आर्ट्स ॲण्ड कॉलेज रोड, नाशिक

★★★

**गोशवारा** – स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारतीय अर्थव्यवस्थेचा नियोजनबद्ध आर्थिक विकास करणे हे एक महत्त्वाचे धोरण ठरविण्यात आले व पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून विकासाची उद्दिष्टे साध्य करण्याचा प्रयत्न होताना दिसून येत आहे. यामध्ये विशेषत बेकारी कमी करून रोजगाराच्या अधिकाधिक संधी निर्माण करणे यावर भर दिला जात आहे. भारतात बेरोजगारी ही समस्या स्वातंत्र्यानंतर आणखी मोठ्या प्रमाणावर उभी राहीली असेही म्हणता येईल, म्हणून भारतातील दारिद्रय व बेरोजगारीची समस्या कमी करण्यासाठी तिसऱ्या पंचवार्षिक योजनेपासून खऱ्या अर्थाने प्रयत्न करण्यात येते

**बीजशब्द** – ग्रामीण, रोजगार, राहणीमान, बेकारी, पंचवार्षिक योजना, दारिद्रय.

**प्रस्तावना** – भारत हा कृशीप्रधान देश असल्याने भारतात ग्रामीण भागात श्रमिक हा महत्वाचा घटक आहे. त्या श्रमिकांस शेतीमध्ये पूर्णवेळ काम मिळत नाही, तर केवळ हंगामामध्ये काम मिळते. इतर वेळी काम करण्याची इच्छा असून देखील काम मिळत नाही म्हणून हंगामी बेकारी निर्माण होते. देशातील बेकारी नष्ट करणे किंवा ती कमी करणे हे सरकारचे उदिष्ट आहे. म्हणूनच काम करण्याची इच्छा असणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस काम देण्याची जबाबदारी सरकारची असते. यातून दारिद्रय निर्मूलनही झपाट्याने कसे करता येईल हेही पाहणे तितकेच महत्वाचे आहे. प्रभावी दारिद्रय निर्मूलनासाठी शाश्वत आर्थिक विकास अत्यंत आवश्यक आहे, असे अनेक अर्थतज्ञांचे मत आहे. १९९० साली जागतिक बँकेने केलेल्या सर्वेक्षणानंतर हाच निष्कर्श काढण्यात आला. "विकास किंवा वृद्धी गरिबांसाठी चांगली आहे" या सूत्रावर आधारीत विकासाच्या प्रवाहात वंचित आणि दुर्लक्षित घटकांचेही उत्थान होते, हा निष्कर्श या सर्वेक्षणातून काढण्यात आला.

भारतीय अर्थव्यवस्था ही मिश्र स्वरूपाची अर्थव्यवस्था असून भारतीय राज्यघटनेमध्ये वेगवेगळी मार्गदर्शन तत्वे आहेत. या तत्त्वांच्या सूचीमध्ये प्रत्येकास रोजगाराची संधी प्राप्त करून देण्याचा प्रयत्न सरकारने करावा असा उल्लेख आहे. सरकारने बेरोजगारी निर्मूलनासाठी पहिल्या तीन पंचवार्षिक योजनांमध्ये अनेक रोजगारपूरक कार्यक्रम राबविले, परंतु बेकारी कमी झाली नाही. भारतात महाराष्ट्र सरकारने रोजगार हमी योजनेची सुरुवात १९६९ मध्ये करून ग्रामीण भागातील नागरीकास काम काही अंशी रोजगाराचा हक्क प्राप्त करून दिला आहे. महाराष्ट्रातील योजनेची यशस्वीता पाहून भारत सरकारने २००५ मध्ये राष्ट्रीय पातळीवर रोजगार हमी योजना सुरू केली, म्हणून ग्रामीण भागाच्या दृष्टीने या योजनेला अधिक महत्व असल्याचे दिसून येते.

विकास, रोजगार आणि दारिद्रय यांच्यातील आंतरसंबंध अर्थतज्ञांसाठी एक चर्चा आणि वादाचा मुद्दा राहिला आहे. विकासाचा दारिद्रयावर कितपत परिणाम होईल हे त्याच्या रोजगार निर्मितीच्या क्षमतेवर अवलंबून असते. भारतात एकंदर विकासाचा दर चांगला राहूनही रोजगार निर्मितीचा परिणाम आणि दर्जा खालावलेला राहिला आहे. प्रामुख्याने रोजगार निर्मिती अल्प उत्पादकता असलेल्या अनौपचारीक क्षेत्रात झालेली आहे. दारिद्रय व बेरोजगारी या संपूर्ण अर्थव्यवस्थेलाच भेडसावणाऱ्या दोन गंभीर समस्या आहेत. 'बेरोजगारी व दारिद्रय या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहे.' रोजगार निर्मिती हा आर्थिक विकास आणि दारिद्रय निर्मूलन, रोजगार निर्मिती, उत्पन्नाचे सामाजिक वर्ग आणि क्षेत्रनिहाय समान वाटप भारतातील आर्थिक धोरणांची प्रमुख उद्दिष्टये राहिली आहेत.

**संशोधन विषयाची निवड** – भारतासारख्या विकसनशील देशाने बेरोजगारीचा वाढलेला भस्मासुर कमी करण्यासाठी आणि ग्रामीण भागात रोजगाराच्या संधीत वाढ करण्यासाठी, शासन स्तरावर विविध पंचवार्शिक योजनांच्या माध्यमातून नियोजनबद्ध आर्थिक विकासाची सुरुवात १९५१ पासूनच केली खरी परंतु त्यातून म्हणावा तसा आर्थिक विकासही झाला नाही व बेकारीची समस्या सुद्धा सुटलेली नाही. म्हणूनच ग्रामीण भागाच्या दृष्टीने महत्वाच्या असणाऱ्या रोजगार योजना व त्यातून आर्थिक विकास कसा साध्य करता येईल या उद्देशाने संशोधकाने संशोधन करण्याचे ठरविले आहे. त्या अनुशंगाने वरील विषयाची निवड करण्यात आलेली आहे.

**संशोधन विषयाची उद्दिष्टये** – प्रस्तुत संशोधन विषयाच्या अभ्यासासाठी पुढील संशोधन उद्दिष्टे निश्चित करण्यात आलेली आहे.

१) पंचवार्षिक योजनांच्या आढाव्यातून आर्थिक विकासाचे महत्व काय ? ते पाहणे.

२) पंचवार्षिक योजनांमधील ग्रामीण विकासाचे कार्यक्रम शोधून त्यांचा अभ्यास करणे.

३) ग्रामीण विकास योजनांची यशस्विता तपासणे.

४) ग्रामीण रोजगार व आर्थिक विकास साध्य करण्यासाठी महत्वपूर्ण षिफारषी सुचविणे.

**संशोधन विषयाची गृहीतकृत्य** – प्रस्तुत संशोधन विषयाच्या अभ्यासासाठी पुढील संषोधन गृहीतके निश्चित करण्यात आलेली आहे.

१) शासनाच्या नियोजनबद्ध धोरणामुळे बेकारीचा प्रश्न सुटला आहे.

२) ग्रामीण रोजगार योजनांमुळे ग्रामीण भागातील मजुरांची राहणीमान पातळी सुधारली आहे.

३) ग्रामीण रोजगार योजना यशस्वी झाल्या आहे.

**संशोधन पद्धती** – प्रस्तुत संशोधन विषयाचा अभ्यास करण्यासाठी द्वितीयक साधनसामुग्रीचा आधार घेण्यात आलेला आहे. या दृष्टिकोनातून वरील विषयाच्या संशोधनासाठी विशेषत वर्णनात्मक व विष्लेशणात्मक संशोधन पद्धतीचा वापर केला गेला आहे. व्दितीयक साधनसामग्रीमध्ये संदर्भग्रंथ, नियतकालिके, मासिके, वर्तमानपत्रे इत्यादी लिखीत साधनांचा वापर करण्यात आलेला आहे.

**मुख्य विषय** – भारत सरकारने योजना काळात बेरोजगारी दूर करणे व दारिद्रय निर्मूलन करणे, या दुहेरी हेतूने पुढील महत्त्वाचे कार्यक्रम सुरू केले. यातील सामुदायिक विकास कार्यक्रम १९५२, राष्ट्रीय विकास सेवा १९५५, अवर्शणप्रवण कार्यक्रम १९७०, किमान गरजा कार्यक्रम १९७२, कामासाठी धान्य कार्यक्रम १९७७, एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम १९७९, ट्रायसेम १९७९, जवाहर रोजगार योजना १९८९, रोजगार अष्वासक योजना १९९३, राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना २००५ इत्यादी कार्यक्रम केंद्र सरकार व राज्य सरकारने राबविले आहेत. या आर्थिक विकास योजनांच्या माध्यमातून लोकांच्या जीवनमानात असलेली दरी कमी करण्यासाठी केंद्र सरकारद्वारा सतत प्रयत्न केले जात आहे.

याचबरोबर ग्रामीण विकास मंत्रालयाने ग्रामीण भागाच्या विकासाच्या अनेक योजना राबविल्या आहेत. त्यांचा मुख्य हेतू दारिद्रय निर्मूलनविशयक कार्यक्रमांना बळकटी आणणे हा होता. परंतु आतापर्यंत सुद्धा देषात मोठ्या प्रमाणावर दारिद्रय कमी झाले नाही व त्यामुळे देशातील गरिबीचे प्रमाण सुद्धा फारसे कमी झाले नाही. भारतातील दारिद्रय प्रमाण काढण्यासाठी विविध संघटना व अर्थतज्ञांनी खालील आकडेवारीचा आधार घेतलेला दिसून येतो.

१) नॅशनल सॅम्पल सर्व्हे ऑर्गनायझेशन NSSO ची आकडेवारी.

२) नॅशनल अकाउटन्स स्टॅटेस्टिक्स (NA)

३) सेंट्रल स्टॅटिस्टिक्स ऑर्गनायझेषन (CSO)ची आकडेवारी

वरील आकडेवारीचे विश्लेषण करत असतांना वेगवेगळे दृष्टिकोन वापरल्या–मुळे भारतातील दारिद्रयरेशेबाबत काढलेल्या निष्कर्शात नेहमीच तफावत आढळते. मार्फत मिळालेल्या आकडेवारी मध्येही संभाव्य त्रुटी आढळून येतात.

जागतिक बँक संबंधित अर्थतज्ञांच्या मते, "आर्थिक वृद्धी हा दारिद्रय कमी करण्याबाबतचा सर्वात महत्वाचा निर्धारक घटक आहे. आर्थिक वृद्धी झाल्याने सरासरी उपभोगात वाढ होते. त्यामुळे दारिद्रयात घट होते, असे या अर्थतज्ञांचे मत आहे.

प्रा. डी. टी. लकडवाला समितीने १९७३–७४ च्या किंमतीनुसार दारिद्रयरेशा ठरवितांना पुढील निकश वापरले.

१) ग्रामीण भागांसाठी दरमहा खर्च करण्याची क्षमता रु. ४९.०९
२) शहरी भागांसाठी दरमहा खर्च करण्याची क्षमता रु. ५६.६४

वरील राकामेव्दारे ग्रामीण भागांमध्ये २,४०० कॅलरीज तर शहरी भागांमध्ये २,१०० कॅलरीज यांचा पुरवठा करू शकणारे अन्नधान्य दरडोई प्रतिदिन मिळण्याची तरतूद मान्य करण्यात आली.

**ग्रामीण दारिद्रयाविषयीचे विविध अभ्यास** – दुसऱ्या पंचवार्षिक योजनेनंतर ग्रामीण भागाच्या विकासाकडे खऱ्या अर्थाने लक्ष देण्यास सुरुवात झाली. मोठ्या प्रमाणावर विचारमंथन झाले व बऱ्याच अर्थतज्ज्ञांनी त्यासाठी अभ्यास करून काही निकश मांडले, पुढील प्रमाणे.

**अ} दांडेकर आणि रथ यांचा अभ्यास**– या अभ्यासानुसार १९५०–६१, १९६७–६८ आणि १९६८–६९ या वर्शात दारिद्रयरेशेखालील कुटुंबांच्या संख्येचे प्रमाण ग्रामीण भारतासाठी ४० : वर्तवण्यात आले असून ते इतर वर्षासाठी सारखेच आहे.

**ब} मॉंटेकसिंग अहलुवालिया यांचा अभ्यास** – मॉंटेकसिंग अहलुवालिया यांच्या अभ्यासाप्रमाणे १९५६–५७ मध्ये ५४.१ : असलेले दारिद्रयाचे प्रमाण कमी होऊन १९६०–६१ मध्ये ३८.९ : झाले. त्यानंतर त्यात वाढ होऊन १९६७–६८ मध्ये ५६.८ : झाले आणि त्यानंतर परत हे प्रमाण कमी होऊन १९७३–७४ मध्ये ४६.

**क} ओझा यांचा अभ्यास** – ओझा यांच्या अभ्यासाप्रमाणे १९६०–६१ मध्ये दारिद्रयाचे प्रमाण ५१.८ तर १९६७–६८ मध्ये हे प्रमाण ७० : असे होते.

**ड} नियोजन मंडळ व जागतिक बँकेचा अभ्यास** नियोजन मंडळ व जागतिक बँक यांच्याकडून १९७० नंतर दारिद्रयाचा अभ्यास करण्यात आला. यामध्ये जागतिक बँकेच्या अभ्यासाप्रमाणे ग्रामीण भागातील दारिद्रय–रेशेखालील कुटुंबांच्या संख्येचे प्रमाण १९७० मध्ये ५३ :, १९८३ मध्ये ४४.९ : आणि १९७८ मध्ये ४१.७ : होते. नियोजन मंडळाच्या अभ्यासानुसार १९८३ मध्ये ४०.४ : आणि १९८७–८८ मध्ये ५२.७ : असे हे प्रमाण होते.

**तक्ता क्र. १ भारतातील निवडक राज्यातील दारिद्रयाचे प्रमाण २००६–०७**

| अ.क्र. | राज्य | ग्रामीण | नागरी | एकूण |
|---|---|---|---|---|
| ०१ | बिहार | ४४.८ | ३२.७ | ३८.७५ |
| ०२ | ओरिसा | ४१.७ | ३७.५ | ३६.६ |
| ०३ | मध्यप्रदेश | २८.७ | ३१.८ | ३०.२५ |
| ०४ | उत्तर प्रदेश | २४.२ | २६.२ | २५.२ |
| ०५ | पश्चिम बंगाल | २१.६ | ६.० | १५.४५ |
| ०६ | महाराष्ट्र | १७.६ | १५.२ | १६.५५ |
| ०७ | राजस्थान | ११.१ | १५.४ | १३.२५ |
| ०८ | आंध्रप्रदेश | ४.६ | १६.० | ११.८ |
| ०९ | कर्नाटक | ७.८ | ८.० | ७.६ |
| १० | तामिळनाडू | ३.७ | ६.६ | ६.६५ |
| ११ | भारत | २०.६४ | २०.४४ | २०.५४ |

**संदर्भ** – दहावी पंचवार्शिक योजना महाराश्ट्राची आर्थिक पाहणी

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, बिहार या राज्यांमध्ये दारिद्र्याचे प्रमाण ग्रामीण व शहरी अशा दोन्ही भागात अधिक आहे. तसेच ओरिसा, मध्यप्रदेष, उत्तरप्रदेष या राज्यांमध्ये सुद्धा दारिद्र्याचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येते तर महाराष्ट्र मध्ये ग्रामीण दारिद्र्य १७.६ : तर नागरी दारिद्र्याचे प्रमाण १५.४ : आढळून येते. याचबरोबर कर्नाटक व तामिळनाडू राज्यांचा विचार केला तर तेथे दारिद्र्याचे प्रमाण बरेच कमी असल्याचे दिसते.

**भारतातील महत्वाच्या पंचवार्षिक योजना व रोजगार निर्मिती कार्यक्रम रू** – १९५१ पासून नियोजनाची सुरुवात होऊन ग्रामीण भागाच्या लोकांची राहणीमान पातळी सुधारायची असेल तर ग्रामीण भागात रोजगार संधी मध्ये वाढ करणे गरजेचे आहे, असा मतप्रवाह पुढे आला व सरकारने ग्रामीण विकास करण्यास सुरुवात केली. त्याचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे.

**१} पहिली पंचवार्षिक योजना** – १ एप्रिल १९५१ ला सुरू झालेल्या या योजनेत सार्वजनिक क्षेत्रात २,०६९ कोटी रु. खर्च करण्याचे सुरुवातीला ठरविण्यात आले, परंतु प्रत्यक्षात या क्षेत्रात १,९६० कोटी रू. खर्च करण्यात आले.

**२} दुसरी पंचवार्षिक योजना** – दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात प्रत्यक्षात ४,६०० कोटी रु. सरकार–कडून खर्च करण्यात आले. दुसरी पंचवार्षिक योजना आधिक महत्वाकांक्षी होती. या योजनेत ग्रामीण भागाच्या विकासासाठी ग्रामीण उद्योग कार्यक्रम १९५७, ग्रामीण आवासी परियोजना १९५७, विशेष पॅकेज कार्यक्रम १९६० इत्यादी ग्रामीण विकासाच्या योजनांची अंमलबजावणी करण्यात आली.

**३} तिसरी पंचवार्षिक योजना** – या योजनेच्या सुरुवातीला मोठ्या प्रमाणावर बेकारी वाढली. त्यामुळे रोजगार निर्मिती करणे महत्वाचे होते. तसेच उत्पन्न व संपत्तीतील विषमता कमी करण्यासाठी काही योजनांची अंमलबजावणी करण्यात आली. त्यामध्ये ग्रामीण उद्योग परियोजना १९६२, कृशी क्षेत्र विकास कार्यक्रम १९६४, शेतकरी प्रशिक्षण किंवा शिक्षा कार्यक्रम १९६६, विहीर निर्माण कार्यक्रम इत्यादी योजनांची अंमलबजावणी करण्यात आली.

**४} चौथी पंचवार्षिक योजना** – या योजनेमधून ग्रामीण विकास कार्यक्रम १९६९, ग्रामीण लोकषक्ती कार्यक्रम १९६९, ग्रामीण रोजगार साख कार्यक्रम १९७१, अवर्शणप्रवण क्षेत्र कार्यक्रम १९७० व क्षेत्र विकास कार्यक्रम १९७२ या योजना राबविल्या गेल्या.

वरील योजनांबरोबरच इतर सर्व पंचवार्षिक योजनेतून रोजगार हमी योजना, रोजगार अश्वासक योजना, पंतप्रधान ग्रामसडक योजना, इंदिरा आवास योजना, एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम, २० कलमी कार्यक्रम असे अनेक योजनांच्या माध्यमातून आतापर्यंत मोठ्या प्रमाणावर रोजगार देण्याचे काम सरकारने केलेले आहे. आपण असेही म्हणू शकतो की, या योजनांमुळे ग्रामीण राहणीमान पातळीत प्रचंड सुधारणा झाली आहे.

**निष्कर्श** – 'ग्रामीण दारिद्र्य, रोजगार व आर्थिक विकास' या विषयाचा अभ्यास करत असतांना ग्रामीण भागातील लोकांच्या आयुष्यात काय बदल झाले, याचाही अभ्यास करण्यात आला. त्याचे निष्कर्ष खालीलप्रमाणे.

१) नियोजनाच्या सुरुवातीला ७० : पेक्षा अधिक असलेले दारिद्र्याचे प्रमाण आज २६ : पर्यंत केली झालेले आहे.

२) वेगवेगळ्या अभ्यासगटांकडून दारिद्र्याचा अभ्यास जरी झाला असला तरी त्यांचे निष्कर्ष जवळपास सारखेच आहेत.

३) विविध पंचवार्षिक योजना काळात देशाचा आर्थिक विकास वेगाने झालेला दिसून येतो.

४) रोजगार हमी योजना व रोजगार अश्वासक योजना यांच्या माध्यमातून ग्रामीण जनतेला रोजगाराची हमी जप्त झाली आहे.

५) सरकारने आर्थिक विकासाच्या दृष्टीने मोठ्या प्रमाणावर खर्च केलेला दिसून येत असल्या तरी त्याची अंमलबजावणी योग्य रीतीने न झाल्यामुळे व पारदर्शकतेच्या अभावामुळे भ्रष्टाचाराचे प्रमाणही वाढलेले दिसून येते.

**शिफारसी** – १) वेगवेगळ्या ग्रामीण रोजगार योजनांच्या कायद्यातील तरतुदींची योग्य अंमलबजावणी तसेच लहान शेतकरी व दारिद्र्यरेषेखालील लोक यांच्या विकासासाठी देशातील ग्रामीण रोजगार योजनांनी कार्य करावे.

२) सरकारच्या नियोजनबद्ध विकासामुळे बेरोजगारीचा प्रश्न म्हणावा तसा सुटलेला नाही. त्यामुळे योजना कार्यान्वित करत असतांना त्यामध्ये एकवाक्यता असावी व ती पूर्णत्वाकडे कृषी जाईल यासाठी प्रयत्न व्हावेत.

३) मजुरांच्या राहणीमान पातळीत वाढ करण्यासाठी ग्रामीण विकास योजना प्रत्येकापर्यंत पोहोचवाव्यात.

४) इंदिरा आवास योजना, पंतप्रधान आवास योजना (ग्रामीण), शबरी आवास योजना अशा योजनांमधून अनुसूचित जाती, अनुसूचित जमातींना अधिक घरकुले देऊन त्यांनाही विकासाच्या मुख्य प्रवाहात आणावे.

५) बेरोजगारी कमी करण्यासाठी विविध ग्रामीण रोजगार योजनांचा रोख शहरांकडेही वळवला पाहिजे. यामुळे शहरी बेरोजगारी कमी होण्यास मदत होईल.

**समारोप** – वरील शिफारशींचा अवलंब करून सरकारने योग्य ती पाऊले उचलली तर निश्चित ग्रामीण दारिद्रय कमी होऊन देशात रोजगार वाढून आर्थिक विकास जलद गतीने होण्यास मदत होऊ शकते.

***संदर्भ सूची –***

*1) Rudra Datta and Sundaram Indian Economy] since Independence Ed- Uma Kapila] Academic Foundation] New Delhi-*

*2) कविमंडल विजय (२००६), 'ग्रामीण विकासाचा एकात्मिक दृष्टिकोन रू नीती, कार्यक्रम आणि व्यवरचना', मंगेश प्रकाशन, नागपूर.*

*3) देसाई संदीप (२००४), भारतापुढे सध्या प्रश्न आहे तरी कोणते ? योजना मासिक, अंक एप्रिल २००४.*

*4) कै. डॉ. श्री. मु. देसाई, डॉ. सौ. निर्मला भालेराव (२०११), 'भारतीय अर्थव्यवस्था', निराली प्रकाशन, पुणे.*

*5) जगताप डी. आर., वाणी नीता, जंगले मंगला, पाटील डी. जी. (२०१३), 'भारतीय अर्थव्यवस्थाय एक दृष्टिक्षेप', प्रशांत पब्लिकेशन, जळगाव.*